SAMPLE CONTENT

# इतिहास व नागरिकशास्त्र

# WORKBOOK



## इयत्ता सहावी

(मराठी व सेमी इंग्रजी माध्यम)

Published by:

LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित अभ्यासक्रमावर आधारित.

# इतिहास व नागरिकशास्त्र

# WORKBOOK

## इयत्ता सहावी

(मराठी / सेमी इंग्रजी माध्यम)

### ठळक वैशिष्ट्ये

- प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला पाठाची झटपट उजळणी अंतर्भूत
- पाठ्यपुस्तकामधील स्वाध्यायात अंतर्भूत सर्व प्रश्न समाविष्ट
- परिपूर्ण सरावाकरिता वैविध्यपूर्ण प्रश्नांचा समावेश
- प्रत्येक पाठाच्या शेवटी 'तोंडी परीक्षा' हा विभाग अंतर्भूत
- पाठातील महत्त्वाच्या उपक्रम / प्रकल्पांचा समावेश
- आवश्यकतेनुसार नकाशावर आधारित प्रश्नांचा समावेश
- उत्तरांसाठी पुरेशी जागा उपलब्ध

नाव : ____________________

शाळा : ____________________

इयत्ता : __________ तुकडी : __________ हजेरी क्र. : __________

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2022MH0007 **TEID: 3446** P.O. No. 11192

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने निर्धारित केलेला ज्ञानरचनाधारित अभ्यासक्रम अधिक कल्पक, सुलभ आणि आनंददायी व्हावा यासाठी **'लेझी बोन एज्युकेशनचे इतिहास व नागरिकशास्त्र Workbook : इयत्ता सहावी'** हे पुस्तक विद्यार्थ्यांना सादर करताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे. हे पुस्तक विद्यार्थीकेंद्रित असून ते CCE पद्धतीनुसार तयार करण्यात आले आहे.

या पद्धतीच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने, आम्ही सक्रीय शिक्षणावर भर देत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकात पाठाची संकलित मूल्यमापन व आकारिक मूल्यमापन अशा दोन भागांत रचना करण्यात आली आहे. प्रत्येक पाठाच्या प्रभावी उजळणीकरिता पाठाच्या सुरुवातीला **'चला, उजळणी करूया!'** हा भाग दिला आहे. यात महत्त्वपूर्ण मुद्दे, तक्ते, सारण्या आणि चित्रांचा समावेश करण्यात आला आहे. यानंतर सुरू होणाऱ्या 'संकलित मूल्यमापन' या विभागात प्रत्येक पाठावर आधारित प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. याची **'पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय'**, **'पाठातील प्रश्न'**, **'चला, सराव करूया!'**, **'तोंडी परीक्षा'** अशा चार भागांत विभागणी केली आहे.

'पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय' या विभागात पाठाच्या शेवटी दिलेल्या स्वाध्यायातील सर्व प्रश्न क्रमवार दिलेले आहेत. त्याचबरोबर 'पाठातील प्रश्न' यात पाठ्यपुस्तकात स्वाध्यायाव्यतिरिक्त देण्यात आलेल्या प्रश्नांचा समावेश असून 'चला, सराव करूया!' या विभागात विद्यार्थ्यांच्या अधिकच्या सरावाकरिता आणि त्यांचा आत्मविश्वास अधिक दृढ करण्याकरिता शक्य तिथे वैविध्यपूर्ण प्रश्न समाविष्ट करण्यात आले आहेत. **'तोंडी परीक्षा'** या विभागात ज्यांची तोंडी उत्तरे दिली जाऊ शकतील अशा पाठावर आधारित वस्तुनिष्ठ प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. यानंतर येणाऱ्या 'आकारिक मूल्यमापन' या विभागामध्ये पाठावर आधारित उपक्रम/प्रकल्प समाविष्ट करण्यात आले आहेत. ज्या प्रश्नांची उत्तरे वेगवेगळी असू शकतील, अशा प्रश्नांना **'मुक्तोत्तरी प्रश्न'** म्हणून संबोधले आहे. या पुस्तकात विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिण्यासाठी पुरेशी जागा देण्यात आली आहे.

या Workbook मधून सर्वोत्तम परिणाम मिळविण्यासाठी, विद्यार्थ्यांनी शाळेत एखादा पाठ शिकवून झाला की लगेच त्याचा सराव करावा आणि कोणत्याही पुस्तकाचा आधार न घेता स्वत: प्रश्नांची उत्तरे लिहावीत. वेळोवेळी Workbook पूर्ण करण्याच्या सवयीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाचे स्वयंपरीक्षण करता येईल आणि त्यांच्या परीक्षेतील यशाचा मार्गही सुगम होईल, याची आम्हांला पूर्ण खात्री आहे.

हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय support@lazybone.in या इ-मेल पत्त्यावर पाठवावा, ही नम्र विनंती.

प्रकाशक

आवृत्ती : प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook of 'इतिहास व नागरिकशास्त्र; पुनर्मुद्रण: ऑक्टोबर २०२१' published by Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

## ◆◆◆ ठळक वैशिष्ट्ये ◆◆◆

### सातत्यपूर्ण आणि सर्वंकष मूल्यमापन (CCE) स्वरूप

सातत्यपूर्ण आणि सर्वंकष मूल्यमापन (CCE) पद्धतीवर आधारित हे पुस्तक विद्यार्थीकेंद्रित असून यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण वाढीसाठी आणि विकासासाठी मदत होईल.

### चला, उजळणी करूया!

प्रत्येक पाठाच्या सुरुवातीस 'चला, उजळणी करूया!' हा विभाग दिला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना पाठाची झटपट उजळणी करण्यास मदत होईल.

### पाठातील प्रश्न

या विभागात पाठातील स्वाध्यायाव्यतिरिक्त देण्यात आलेल्या काही महत्त्वपूर्ण प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यास मदत मिळेल.

### चला, सराव करूया!

या विभागात विद्यार्थ्यांच्या अधिकच्या सरावासाठी देण्यात आलेल्या विविध प्रकारच्या प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांना पाठाचा अधिक चांगला सराव करता येईल आणि संकल्पनाही चांगल्याप्रकारे समजतील.

### मुक्तोत्तरी प्रश्न

या प्रश्नांत विद्यार्थ्यांना स्वत: प्रश्नाचे उत्तर देण्याचे स्वातंत्र्य मिळते. विद्यार्थ्यांची तर्कशक्ती विकसित होऊन त्यांच्या मनात इतिहासाविषयीची आवड निर्माण होण्यासाठी या प्रश्नांचा समावेश जाणीवपूर्वक करण्यात आला आहे.

### मौखिक कार्य

या पुस्तकातील 'मौखिक कार्य' असे संबोधण्यात आलेल्या काही प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांची ज्ञानात्मक कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल.

### तोंडी परीक्षा

'तोंडी परीक्षा' या विभागात विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणाऱ्या आणि पाठात समाविष्ट असलेल्या संकल्पनांच्या आकलनातून त्यांच्या उत्तरांपर्यंत पोहोचता येईल अशा प्रश्नांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

Sample Content

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **इतिहास** | |
| १. | भारतीय उपखंड आणि इतिहास | १ |
| २. | इतिहासाची साधने | ८ |
| ३. | हडप्पा संस्कृती | १४ |
| ४. | वैदिक संस्कृती | २० |
| ५. | प्राचीन भारतातील धार्मिक प्रवाह | २९ |
| ६. | जनपदे आणि महाजनपदे | ३९ |
| ७. | मौर्यकालीन भारत | ४६ |
| ८. | मौर्य साम्राज्यानंतरची राज्ये | ५४ |
| ९. | दक्षिण भारतातील प्राचीन राज्ये | ६४ |
| १०. | प्राचीन भारत : सांस्कृतिक | ७१ |
| ११. | प्राचीन भारत आणि जग | ८१ |
| | **नागरिकशास्त्र** | |
| १. | आपले समाजजीवन | ८८ |
| २. | समाजातील विविधता | ९२ |
| ३. | ग्रामीण स्थानिक शासन संस्था | ९६ |
| ४. | शहरी स्थानिक शासन संस्था | १०४ |
| ५. | जिल्हा प्रशासन | १११ |


**[टीप : पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

# १. भारतीय उपखंड आणि इतिहास

## चला, उजळणी करूया!

### १.१ इतिहासाची घडण आणि भौगोलिक वैशिष्ट्ये

१. इतिहास म्हणजे मानवी संस्कृतीच्या प्रवासात घडलेल्या सर्व प्रकारच्या भूतकालीन घटनांची सुसंगत मांडणी होय.

२. स्थल, काल, व्यक्ती आणि समाज म्हणजे इतिहासाचे चार प्रमुख आधारस्तंभ आहेत.

३. यांपैकी स्थल हा घटक भूगोलाशी म्हणजे भौगोलिक परिस्थितीशी संबंधित आहे.

४. भौगोलिक परिस्थिती इतिहासावर अनेक प्रकारे परिणाम करत असते म्हणून इतिहास व भूगोल यांचे नाते अतूट आहे.

५. आपला आहार, वेशभूषा, घरबांधणी, व्यवसाय इत्यादी गोष्टी बऱ्याचदा आपण जिथे राहतो त्या परिसराच्या भौगोलिक वैशिष्ट्यांवर अवलंबून असतात.

६. उदाहरणार्थ, डोंगराळ प्रदेश :
   i. येथे राहणाऱ्या लोकांचे जीवन मैदानी प्रदेशात राहणाऱ्या लोकांपेक्षा अधिक श्रमाचे असते.
   ii. डोंगराळ प्रदेशात सुपीक शेतजमिनीची उपलब्धता कमी असल्यामुळे येथील लोकांना तृणधान्ये व भाज्या कमी प्रमाणात उपलब्ध असतात.
   iii. परिणामी, येथील लोकांना अन्नासाठी शिकारीवर व जंगलातून गोळा केलेल्या पदार्थांवर अवलंबून राहावे लागते.

७. आपण राहतो तेथील हवामान, पर्जन्यमान, शेती, वनस्पती व प्राणी इत्यादी गोष्टी आपल्या जगण्याची साधने असतात. हे घटक आपल्या जीवनपद्धती व संस्कृतीवर प्रभाव पाडत असतात.

८. जगण्याची साधने जिथे भरपूर प्रमाणात उपलब्ध असतात तिथे मानवी समूह जास्त काळ वस्ती करतो. काही काळानंतर या वस्त्यांचे ग्राम-वसाहती व नगरांत रूपांतर होते.

९. काही वेळा पर्यावरणाचा ऱ्हास, दुष्काळ, आक्रमणे किंवा इतर कारणांमुळे जगण्याची साधने अपुरी पडू लागतात, अशा वेळी लोकांना गाव सोडून जावे लागते. ग्राम-वसाहती, नगरे लोकांविना उजाड होतात.

### १.२ भारताची भौगोलिक वैशिष्ट्ये

१. विस्ताराने मोठ्या असलेल्या आपल्या भारत देशाच्या उत्तरेला हिमालय, पूर्वेला बंगालचा उपसागर, पश्चिमेला अरबी समुद्र तर दक्षिणेस हिंदी महासागर आहे.

२. अंदमान-निकोबार व लक्षद्वीप बेटे वगळून भारताचा उरलेला सर्व प्रदेश भौगोलिकदृष्ट्या सलग आहे.

३. इ.स. १९४७ पूर्वी आजचे पाकिस्तान व बांगलादेश भारताचा भाग होते.

४. **भारतीय इतिहासाच्या जडणघडणीनुसार भारताचे महत्त्वाचे सहा भूप्रदेश :**

**(i) हिमालय :**

अ. हिंदुकुश व हिमालय पर्वतामुळे भारतीय उपखंडाच्या उत्तरेला एक अभेद्य भिंत उभी राहिली आहे. ही भिंत भारतीय उपखंडाला मध्य आशियातील वाळवंटापासून अलग करते.

ब. पण, हिंदुकुश पर्वतातील खैबर, बोलन या खिंडींतून जाणारा खुश्कीचा व्यापारी मार्ग हा मध्य आशियातून जाणाऱ्या प्राचीन व्यापारी मार्गाशी जोडला गेला होता.

क. चीनपासून निघून मध्य आशियातून अरबी प्रदेशापर्यंत जाणारा व्यापारी मार्ग 'रेशीम मार्ग' म्हणून ओळखला जातो, कारण या मार्गावरून पश्चिमेकडील देशांत मुख्यत: रेशीम पाठवले जाई.

**(ii) सिंधू-गंगा-ब्रह्मपुत्रा नद्यांचा मैदानी प्रदेश :**

अ. सिंधू, गंगा, ब्रह्मपुत्रा या तीन मोठ्या नद्या व त्यांच्या उपनद्या यांच्या खोऱ्यांचा हा प्रदेश आहे.

ब. हा प्रदेश पश्चिमेकडील सिंध-पंजाबपासून पूर्वेकडे सध्याच्या बांगलादेशपर्यंत पसरला आहे.

क. भारतातील सर्वाधिक प्राचीन नागरी हडप्पा संस्कृती व त्यानंतरची प्राचीन गणराज्ये व साम्राज्ये येथेच उदयास आली.

**(iii) थरचे वाळवंट :**

अ. थरचे वाळवंट राजस्थान, हरियाणा व गुजरात या प्रदेशांतील काही भागांत पसरलेले आहे. आजच्या पाकिस्तानातही त्याचा काही भाग आहे.

Sample Content

ब. त्याच्या उत्तरेला सतलज नदी, पूर्वेला आरवली पर्वत रांगा, दक्षिणेला कच्छचे रण आणि पश्चिमेला सिंधू नदी आहे.

क. हिमाचल प्रदेशात उगम पावणारी घग्गर नावाची नदी थरच्या वाळवंटात पोहोचते. पाकिस्तानमध्ये तिला 'हाकरा' नावाने संबोधतात. या नदीच्या राजस्थान व पाकिस्तानमध्ये कोरड्या पडलेल्या पात्रात हडप्पा संस्कृतीची अनेक स्थळे विखुरलेली आहेत.

**(iv) दख्खनचे पठार :**

अ. एका बाजूस पूर्व किनारा तर दुसऱ्या बाजूस पश्चिम किनारा यांमध्ये असलेला भारताचा भूप्रदेश दक्षिणेकडे निमुळता होत जातो.

ब. त्याच्या पश्चिम बाजूला अरबी समुद्र, दक्षिणेला हिंदी महासागर आणि पूर्वेला बंगालचा उपसागर आहे.

क. दख्खन पठारावरील पर्वतरांगा :

(१) दख्खन पठाराच्या उत्तरेस – सातपुडा व विंध्य पर्वतरांगा.

(२) दख्खन पठाराच्या पश्चिमेस – सह्याद्री पर्वतरांगा. त्यांना 'पश्चिम घाट' असेही म्हणतात.

(३) दख्खन पठाराच्या पूर्वेस – पूर्व घाटाच्या डोंगररांगा

ड. या पठारावरील जमीन सुपीक आहे. तिथे हडप्पा संस्कृतीनंतरच्या काळात अनेक कृषिप्रधान संस्कृती बहरल्या होत्या. इथे अनेक छोटी-मोठी साम्राज्ये होऊन गेली, त्यांपैकी मौर्य साम्राज्य या प्राचीन भारतातील सर्वाधिक मोठ्या साम्राज्यात दख्खन पठाराचा समावेश होता.

**(v) समुद्रकिनाऱ्यांचे प्रदेश :**

अ. हडप्पा संस्कृतीच्या काळापासूनच प्राचीन भारतात पश्चिमेकडील देशांशी सागरी मार्गाने व्यापार चालत असे. त्यामुळे, भारताच्या समुद्रकिनाऱ्यांवरील बंदरांतून परदेशातील संस्कृती व लोकांशी भारताचा संपर्क आणि देवाण-घेवाण होत असे.

ब. नंतरच्या काळात जरी खुश्कीच्या मार्गाने म्हणजेच जमिनीवरूनही व्यापार व दळणवळण सुरू झाले, तरीही सागरी मार्गाचे महत्त्व कायम राहिले.

**(vi) समुद्रातील बेटे :**

अ. बंगाल उपसागरातील भारतीय बेटे : अंदमान आणि निकोबार    ब. अरबी समुद्रातील भारतीय बेटे : लक्षद्वीप

क. या बेटांचे प्राचीन काळच्या समुद्री व्यापारात महत्त्वाचे स्थान होते.

ड. 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' म्हणजे 'तांबड्या समुद्राचे माहितीपुस्तक' या एका अनामिक ग्रीक खलाश्याने लिहिलेल्या पुस्तकात भारतीय बेटांचा उल्लेख आहे.

## १.३ भारतीय उपखंड

१. अफगाणिस्तान, पाकिस्तान, नेपाळ, भूटान, बांगलादेश, श्रीलंका व भारत देश मिळून तयार होणाऱ्या भूभागाला 'दक्षिण आशिया' असे म्हटले जाते.

२. या भूभागातील भारत देशाचा विस्तार व महत्त्व लक्षात घेऊन या प्रदेशाला 'भारतीय उपखंड' असेही म्हटले जाते.

३. हडप्पा संस्कृतीचा विस्तार मुख्यत: भारतीय उपखंडाच्या वायव्य भागात झाला होता. हडप्पा व मोहेंजोदडो ही शहरे आज पाकिस्तानात आहेत.

४. चीन व म्यानमार ही आपली शेजारी राष्ट्रे दक्षिण आशियाचा किंवा भारतीय उपखंडाचा भाग नाहीत. तरीही प्राचीन भारताशी त्यांचे ऐतिहासिक संबंध आले होते.

## संकलित मूल्यमापन

### पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय

### I. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

*१. **इतिहास म्हणजे काय?**

उत्तर : ---

---

Sample Content

*२. मानवी समाज दीर्घकाळ वस्ती कोठे करतो ?

उत्तर :

*३. डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या लोकांना अन्नासाठी प्रामुख्याने कशावर अवलंबून राहावे लागते ?

उत्तर :

*४. भारतातील सर्वाधिक प्राचीन नागरी संस्कृती कोणती ?

उत्तर :

## II. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

*१. मानवी समाजजीवन कोणत्या गोष्टींवर अवलंबून असते ?

उत्तर :

*२. आपण राहतो त्या प्रदेशातील कोणत्या गोष्टी आपल्या जगण्याची साधने असतात ?

उत्तर :

*३. 'भारतीय उपखंड' असे कोणत्या प्रदेशाला म्हणतात ?

उत्तर :

## III. कारणे लिहा.

*१. इतिहास आणि भूगोल यांचे नाते अतूट असते.

उत्तर :

Sample Content

*२. लोकांना गाव सोडून जाणे भाग पडते.

उत्तर :

## IV. फरक स्पष्ट करा.

*१. डोंगराळ प्रदेश व मैदानी प्रदेश यांच्या लोकजीवनातील फरक स्पष्ट करा.

उत्तर :

| डोंगराळ प्रदेशातील लोकजीवन | मैदानी प्रदेशातील लोकजीवन |
|---|---|
| | |

Sample Content

**असे प्रश्न :**

(i) ----------

(ii) ----------

(iii) ----------

(iv) ----------

## पाठातील प्रश्न

### I. सांगा पाहू. (मौखिक कार्य)

**१. सांडपाणी वाहून नेणारी गटारे झाकलेली नसतील, तर आरोग्याच्या कोणकोणत्या समस्या निर्माण होतात?**

उत्तर : ----------

----------

----------

----------

## चला, सराव करूया!

### I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१. हडप्पा संस्कृतीला ---------- संस्कृती या नावानेही ओळखले जाते.

२. हडप्पाकालीन संस्कृतीतील नगररचनांमध्ये रस्त्यावरील गटारे ---------- नी बांधून काढलेली असत.

३. हडप्पा संस्कृतीचे लोक मृत व्यक्तीचे दफन करताना त्या व्यक्तीच्या शवाबरोबर ---------- भांडी पुरत असत.

४. हडप्पा संस्कृतीने ---------- संस्कृतीचा पाया घातला.

### II. योग्य पर्यायाला ☑ अशी खूण करा.

१. हडप्पा संस्कृतीतील ---------- दोन किंवा अधिक विभाग केलेले असत.

अ. नगरांचे ☐ ब. गावांचे ☐ क. रस्त्यांचे ☐

२. हडप्पा संस्कृतीतील नगराच्या प्रत्येक विभागाला स्वतंत्र ---------- केलेली असे.

अ. तटबंदी ☐ ब. प्रशासन व्यवस्था ☐ क. पाण्याची व्यवस्था ☐

३. हडप्पा संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननामध्ये मिळालेल्या भांड्यांमध्ये लाल रंगांच्या पृष्ठभागावर ---------- रंगाने नक्षी काढलेली भांडी आहेत.

अ. पांढऱ्या ☐ ब. निळ्या ☐ क. काळ्या ☐

Sample Content

## III. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. इतर कोणत्या ठिकाणी हडप्पा संस्कृतीसारखेच अवशेष सापडले आहेत ?

उत्तर :

२. हडप्पाकालीन दागिने कोणत्या साहित्यापासून बनवलेले असत ?

उत्तर :

३. हडप्पा संस्कृतीतील स्त्री-पुरुष कोणत्या प्रकारचे दागिने वापरत असत ?

उत्तर :

## IV. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. हडप्पा संस्कृतीच्या मुद्रांविषयी माहिती लिहा.

उत्तर :

२. हडप्पा संस्कृतीतील शेतीविषयी सविस्तर माहिती लिहा.

उत्तर :

३. हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे कोणती ?

उत्तर :

Sample Content

## V. टिपा लिहा.

१. **हडप्पा संस्कृतीतील घरे**

उत्तर : ----------------------------------------

२. **महास्नानगृह**

उत्तर : ----------------------------------------

### तोंडी परीक्षा

१. हडप्पा संस्कृतीमध्ये सांडपाणी वाहून नेण्यासाठी कशाचा उपयोग केला जाई ?

२. हडप्पाकालीन लोक कोणत्या प्रकारची वस्त्रे वापरत ?

## आकारिक मूल्यमापन

### उपक्रम / प्रकल्प

*१. **हडप्पा संस्कृतीच्या काळातील इतर जागतिक संस्कृती जगाच्या नकाशा आराखड्यात दाखवा.**

२. **निरीक्षण करा.**
**तुमच्या परिसरातील पोहण्याच्या तलावाला भेट द्या. तलावातील पाणी बदलण्याच्या व नव्याने तलावात पाणी सोडण्याच्या पद्धतीचे निरीक्षण करा. सध्याचा पोहण्याचा तलाव व हडप्पाकालीन स्नानगृह यांची तुलना करा.**

*३ **तुमच्या शाळेचा आराखडा तयार करा व शाळेतील विविध ठिकाणे दर्शवा. उदा. ग्रंथालय, मैदान, संगणक-कक्ष इत्यादी.**

*४ **तुमच्या गावातील आणि घरातील धान्य साठवण्याच्या पद्धतींचे सविस्तर टिपण तयार करा.**

शिक्षकांचा शेरा : ---------------------------------------- दिनांक : --------------------

Sample content

# ४. वैदिक संस्कृती

## चला, उजळणी करूया!

### ४.१ वैदिक वाङ्मय

१. जी संस्कृती 'वेद' वाङ्मयावर आधारलेली आहे तिला 'वैदिक संस्कृती' असे म्हणतात.

२. वैदिक वाङ्मय संस्कृत भाषेत रचले गेले असून ते अत्यंत समृद्ध आहे. यामध्ये चार वेद, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके व उपनिषदे यांचा समावेश होतो. हे वाङ्मय रचण्यास सुमारे पंधराशे वर्षांचा कालावधी लागला. वेदकालीन संस्कृतीतील बदलांचा व वेदकालीन लोकजीवनाचा अभ्यास करण्यासाठी वैदिक वाङ्मय हे महत्त्वाचे साधन ठरते.

३. वेदांना 'श्रुति' असेही म्हटले जाते. चार वेदांच्या ग्रंथांना 'संहिता' असे म्हणतात. वेदांचे जतन मौखिक पठणाच्या आधारे केले गेले.

४. **चार वेद:**

**(i) ऋग्वेद संहिता**

(अ) ऋग्वेद हा वैदिक वाङ्मयातील मूळ ग्रंथ मानला जातो.

(ब) ऋचांनी बनलेला वेद म्हणजे 'ऋग्वेद' होय.

(क) अनेक ऋचा एकत्र गुंफून एखाद्या देवतेची स्तुती करण्यासाठी तयार केलेल्या काव्याला 'सूक्त' म्हटले जाते. ऋग्वेद संहितेत विविध देवतांची स्तुती करणारी सूक्ते आहेत.

**(ii) यजुर्वेद संहिता**

(अ) यजुर्वेद संहितेत यज्ञात म्हटले जाणारे मंत्र आहेत.

(ब) यज्ञविधींमध्ये कोणत्या मंत्राचे पठण केव्हा व कसे करावे याचे मार्गदर्शन या संहितेत आहे.

(क) पद्यात असणारे मंत्र व त्या मंत्रांचे गद्यात दिलेले स्पष्टीकरण अशी या संहितेची रचना आहे.

**(iii) सामवेद संहिता**

(अ) सामवेद संगीताशी संबंधित वेद आहे.

(ब) काही यज्ञविधींच्या वेळी तालासुरांत मंत्रगायन कसे करावे, याचे मार्गदर्शन सामवेद संहितेत केले आहे. त्यामुळे, भारतीय संगीताच्या निर्मितीत सामवेदाचा मोठा वाटा आहे.

**(iv) अथर्वेद संहिता**

(अ) अथर्ववेदाच्या संहितेला अथर्व ऋषींचे नाव दिले आहे.

(ब) अथर्ववेदात दैनंदिन जीवनातील विविध गोष्टींना महत्त्व दिलेले आहे.

(क) आयुष्यात येणारी संकटे, दुखणी यांवर करण्याचे उपाय, तसेच अनेक औषधी वनस्पतींची माहितीही यात दिलेली आहे.

(ड) राजाने राज्य कसे करावे, याचेही मार्गदर्शन या वेदात केले आहे.

५. **ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि उपनिषदे :** चार संहितांच्या रचनेनंतर ब्राह्मणग्रंथ, आरण्यके व उपनिषदे यांची रचना केली गेली.

**(i) ब्राह्मणग्रंथ :**

(अ) यज्ञविधींमध्ये वेदांचा वापर कसा करावा हे सांगणाऱ्या ग्रंथांना 'ब्राह्मणग्रंथ' म्हणत

(ब) प्रत्येक वेदाचे स्वतंत्र ब्राह्मणग्रंथ आहेत.

**(ii) आरण्यके :** यज्ञविधी पार पाडत असताना कोणत्याही प्रकारची चूक होऊ नये, याची खबरदारी आरण्यकांमध्ये घेतलेली दिसते.

**(iii) उपनिषदे :**

(अ) 'उपनिषद्' म्हणजे गुरूजवळ बसून मिळवलेले ज्ञान.

(ब) जन्म-मृत्यूसारख्या गहन प्रश्नांवर उपनिषदांमध्ये चर्चा केलेली आहे.

Sample Content

## पाठातील प्रश्न

### I. चला, चर्चा करू. (मौखिक कार्य)

**१. सृष्टिचक्रात बिघाड कशामुळे होऊ शकतात? ते होऊ नये म्हणून तुम्ही कोणते प्रयत्न कराल? उदा. पाऊस कमी पडला, तर पिण्याच्या पाण्याचे नियोजन कसे कराल?**

उत्तर : ----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

Sample Content

## चला, सराव करूया!

### I. रिकाम्या जागा भरा.

१. 'वेद' या संज्ञेचा अर्थ ---------- होतो.

२. ---------- संहितेत विविध देवतांची स्तुती करणारी सूक्ते आहेत.

३. प्रत्येक वेदाचे स्वतंत्र ---------- आहेत.

४. यज्ञविधी पार पाडत असताना कोणत्याही प्रकारची चूक होऊ नये, याची खबरदारी ---------- मध्ये घेतलेली दिसते.

५. सृष्टिचक्रात बिघाड झाल्यावर ---------- येतात, असे वेदकालीन लोक मानत.

### II. योग्य पर्यायाला ✓ अशी खूण करा.

१. पद्यात असणारे मंत्र आणि गद्यात दिलेले त्या मंत्रांचे स्पष्टीकरण अशी................ संहितेची रचना आहे.

(अ) ऋग्वेद ☐ (ब) यजुर्वेद ☐ (क) सामवेद ☐

२. ................ म्हणजे गुरूजवळ बसून मिळवलेले ज्ञान.

(अ) ब्राह्मणग्रंथ ☐ (ब) आरण्यके ☐ (क) उपनिषदे ☐

३. वैदिक काळात जन्मापासून मृत्यूपर्यंत जीवनाचे ................ टप्पे किंवा आश्रम मानले होते.

(अ) दोन ☐ (ब) तीन ☐ (क) चार ☐

४. राजा हा ................ चा प्रमुख असे.

(अ) जन ☐ (ब) विश् ☐ (क) ग्राम ☐

५. वेद, स्मृती, पुराणे, स्थानिक लोकधारणा इत्यादींवर आधारलेला धार्मिक प्रवाह कालांतराने ................ या नावाने ओळखला जाऊ लागला.

(अ) जैन ☐ (ब) हिंदू ☐ (क) बौद्ध ☐

## III. एका शब्दात उत्तरे लिहा.

उत्तरे :

१. अनेक ऋचा एकत्र गुंफून एखाद्या देवतेची स्तुती करण्यासाठी तयार केलेले काव्य. – ------------------------

२. वेदकालीन रथांची चाके या प्रकारची असत. – ------------------------

३. गुरुजवळ राहून विद्या प्राप्त करण्याचा काळ. – ------------------------

४. वेदकाळात करवसुली करण्यासाठी नेमलेला अधिकारी. – ------------------------

## IV. पाठातील आशयाचा विचार करून नावे लिहा.

**१. वैदिक साहित्यातील एक ग्रंथ ज्यामध्ये अरण्यात जाऊन, एकाग्रचित्ताने केलेले चिंतन मांडलेले आहे.**

उत्तर : ------------------------------------------------------------

**२. वेदकालीन स्त्री-पुरुष वापरत असलेले दागिने.**

उत्तर : ------------------------------------------------------------

## V. तक्ता पूर्ण करा.

| | व्यवस्था | | प्रमुख |
|---|---|---|---|
| (i) | ग्रामवसाहती | (a) | ------------------ |
| (ii) | ------------------ | (b) | गृहपती |
| (iii) | श्रेणी | (c) | ------------------ |
| (iv) | ------------------ | (d) | ------------------ |

Sample Content

## VI. चूक की बरोबर ओळखा.

१. कालांतराने वेदकाळात स्त्रियांवरील बंधने हळूहळू वाढत गेल्यामुळे त्यांचे कुटुंबातील व समाजातील स्थान दुय्यम होत गेले.

उत्तर :

२. वेदकाळात राज्यातील ज्येष्ठ व्यक्तींच्या मंडळास 'सभा' म्हणत, तर लोकांच्या सर्वसाधारण बैठकीस 'समिती' असे म्हणत.

उत्तर :

## VII. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि उपनिषदे केव्हा रचली गेली ?

उत्तर :

२. ब्राह्मणग्रंथांची रचना का केली गेली ?

उत्तर :

३. उपनिषदांमध्ये कशावर चर्चा केली गेली ?

उत्तर :

४. वैदिक काळात कोणत्या प्रकारची कुटुंबव्यवस्था अस्तित्वात होती ?

उत्तर :

५. कुटुंबामध्ये कोणाचा समावेश होत असे ?

उत्तर :

६. वेदकालीन लोकांची प्रमुख वाद्ये कोणती ?

उत्तर :

## VIII. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. वेदकाळातील लोकांच्या वस्त्रांविषयी आपल्याला कोणती माहिती मिळते ?

उत्तर :

२. जातिव्यवस्था कशी निर्माण झाली ? याचा समाजावर कोणता परिणाम झाला ?

उत्तर :

Sample Content

## IX. टिपा लिहा.

**अथर्ववेद संहिता**

**उत्तर :**

### तोंडी परीक्षा

१. भारतीय संगीताच्या निर्मितीमध्ये कोणत्या वेदाचा मोठा वाटा आहे ?

२. अश्वशक्ती हे एकक काय मोजण्यासाठी वापरले जाते ?

३. वानप्रस्थाश्रमामध्ये व्यक्तीने काय करणे अपेक्षित होते ?

## आकारिक मूल्यमापन

### उपक्रम / प्रकल्प

*१. **आपल्या परिसरातील काही कारागिरांच्या मुलाखती घेऊन त्यांची माहिती लिहा.**

शिक्षकांचा शेरा : दिनांक :

Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. VI:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

**NOTES**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

**NOTES**
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास - नागरिकशास्त्र व भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

**WORKBOOK**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

## AVAILABLE BOOKS FOR STD. VII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

**NOTES**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

**NOTES**
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

**WORKBOOK**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

## ADDITIONAL TITLES
- English Grammar & Writing Skills Book
- Hindi Grammar & Writing Skills Book
- Marathi Grammar & Writing Skills Book




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

## OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

**Visit Our Website**

Marketed by:
**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.

**Address:**
B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z,
Wagle Industrial Estate, Thane (W)- 400604

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of STATIONERY